सकाळ पु. पा. १०

# वसईतील २९ गावांचा प्रश्न पेटणार

## पालिकेतून वगळण्याच्या मागणीसाठी तहसीलवर मोर्चा

वसई, ता. २० (बातमीदार) : वसई-विरार महापालिकेची स्थापना झाल्यावर त्यात अनेक गावांचा समावेश करण्यात आला. त्यानंतर पश्चिमेकडील अनेक गावांतून याला विरोध झाला. या निर्णयाविरोधात पण मोठ्या प्रमाणात आंदोलन करून सरकारला कोंडीत पकडण्यात आले. पण आता या २९ गावांचा मुद्दा पुन्हा तापू लागला आहे. या गावातील ग्रामस्थांनी महापालिकेतून वगळावे, अशी मागणी करत वसई तहसीलदार कार्यालयावर मृत्युंजय मोर्चा काढला.

वसई पश्चिमेतील २९ गावांचा महापालिकेत समावेश करण्यास तेथील ग्रामस्थांनी विरोध दर्शवला होता. यासाठी हरित पट्टा कायम ठेवा, महापालिका नको अशी भूमिका घेत गाव संघर्ष समिती जनआंदोलन व विविध संघटना पक्षांनी आंदोलन केले होते. हे आंदोलन इतके चिघळले होते की याचे पडसाद राज्यात उमटले होते. माजी आमदार विवेक पंडित हे देखील रस्त्यावर उतरले होते. आता पुन्हा हा मुद्दा तापण्याची चिन्हे निर्माण झाली आहे. कारण या २९ गावांना महापालिकेतून वगळावे, अशी मागणी करत ग्राम स्वराज्य समितीने मृत्युंजय मोर्चा काढला. यावेळी विविध समस्या मांडत पालिका प्रशासनाविरोधात तीव्र संताप व्यक्त करण्यात आला.

'महापालिकेपेक्षा ग्रामपंचायत बरी' अशी भूमिका येथील ग्रामस्थ मांडत आहेत. या गावातील सरकारी शाळा या जिल्हा परिषदेच्या अखत्यारीत येतात. मग महापालिका शिक्षण कर का घेत आहे, विद्यार्थ्यांना कोणत्या सुविधा किंवा शाळा महापालिकेने उभारल्या आहेत, असा सवाल मोर्चात सहभागी झालेल्यांनी उपस्थित केला आहे. तसेच गावात शासकीय रुग्णालय नाही, पावसाळी पाण्याचे नियोजन नाही, पाणीपुरवठा योजना अद्याप प्रलंबित आहे. केवळ आश्वासन दिले जात आहेत, पण अजूनही शुद्ध पाणी उपलब्ध झाले नाही. महापालिकेने घरपट्टी करात वाढ केली आहे, परिवहन सेवा देखील गावात सेवा देण्यासाठी अपुरी आहे. त्यापेक्षा एसटी सेवा योग्य असल्याचे देखील मोर्चात सहभागी झालेल्या ग्रामस्थांनी सांगितले. 'हरित पट्टा' हा गावपण टिकवून ठेवत आहेत. पण या गावात 'एफएसआय'मध्ये वाढ करण्यात आली आहे. त्यामुळे इमारतींचे प्रमाण वाढणार आहे. त्यामुळे येथील हिरवेगार गावे नष्ट होऊन प्रदूषणाचा विळखा, ऑक्सिजनचा कमतरता निर्माण होणार आहे, असेही मोर्चेकरांचे म्हणणे आहे.



वसई : महापालिकेतून वगळण्याची मागणी करत २९ गावातील ग्रामस्थांनी तहसील कार्यालयावर मृत्युंजय मोर्चा काढला.

महापालिकेत समावेश करण्याला येथील गावाचा विरोध आहे. तसेच एफएसआय वाढ केल्याने या गावातील हरितपट्टा नष्ट होण्याची भीती आहे. परिवहनची सेवा, पाण्याची समस्या कायम आहेत. त्यामुळे मृत्युंजय मोर्चातून लक्ष वेधले असून सरकारच्या भूमिकेची प्रतीक्षा करत आहोत.
- डॉमनिका डाबरे, नेत्या, जनआंदोलन समिती

महापालिका शिक्षण कर मोठ्या प्रमाणात वसूल करत आहे. मात्र विद्यार्थ्यांना सुविधा नाहीत, त्यामुळे या कराचे नियोजन महापालिका कसे करते, अनेक असुविधांचा सामना नागरिकांना करावा लागत आहे. परंतु प्रशासन कानाडोळा करत आहे.
- विनायक निकम, माजी विरोधी पक्षनेते

### मुख्यमंत्री लक्ष देतील का ?

एकीकडे पालिकेला पूर्वीपासून विरोध दर्शविला जात असताना अचानक पुन्हा गावासह अन्य मुद्दे चर्चेला आले आहेत. त्यामुळे गावाचा मुद्दा ऐन उन्हाळ्यात तापू लागला असल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आमच्या समस्यांकडे लक्ष देतील का, असा सवाल यावेळी करण्यात आला.

महापालिकेचा कारभार सध्या आहे. महापालिका नको यासाठी लोकशाही मार्गाने लढा देत आलो. जी गावे पालिकेत आहेत, त्यांना पुरेशा सुविधा दिल्या गेल्या नाहीत. तसेच प्रदूषण, कचराभूमी यासह अनेक समस्या वाढल्या आहेत.
- मिलिंद खानोलकर,
ग्राम स्वराज्य समिती

नागरिकांना अनेक समस्या भेडसावत आहेत. पण महापालिका प्रशासन शांत आहे. सरकारचे लक्ष नाही, केवळ घोषणांचा पाऊस पाडला जात असून पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सुटत नाही.
- ओनील आल्मेडा,
जिल्हाध्यक्ष, काँग्रेस

Scanned with CamScanner

सकाळ ५-मा-२०

# भाईंदरमध्ये श्रमजीवीचा एल्गार

## जोशी रुग्णालयप्रश्नी अतिरिक्त तहसीलदार कार्यालयावर मोर्चा

भाईंदर, ता.२० (बातमीदार): भाईंदर येथील भारतरत्न पंडित भीमसेन जोशी रुग्णालयाच्या खासगीकरणाच्या प्रस्तावाला तीव्र विरोध करत श्रमजीवी संघटनेने सोमवारी अतिरिक्त तहसीलदार कार्यालयावर मोर्चा काढला. यावेळी संघटनेच्या कार्यकर्त्यांनी भीक मांगो आंदोलन करून जमा झालेले पैसे अतिरिक्त तहसीलदारांना सुपूर्द केले. खासगीकरणाचा प्रस्ताव रद्द झाला नाही तर आणखी प्रखर आंदोलन करण्याचा इशारा श्रमजीवी संघटनेने यावेळी दिला.



भाईंदर : जोशी रुग्णालय खासगीकरणाविरोधात श्रमजीवी संघटनेने मोर्चा काढला. यावेळी भीक मांगो आंदोलन करण्यात आले. (छायाचित्र : प्रकाश लिमये)

जोशी रुग्णालयाची अवस्था दयनीय झाली असल्याने त्याचे खासगीकरण करण्याचा प्रस्ताव राज्य सरकारच्या विचाराधीन आहे. या प्रस्तावाला श्रमजीवी संघटनेने विरोध केला आहे. भीमसेन जोशी हे शहरातील एकमेव सरकारी रुग्णालय आहे. या रुग्णालयात गोरगरिबांना मोफत तसेच शासकीय दरात उपचार मिळत आहेत. कोविड काळात खासगी रुग्णालयांकडून लूटमार सुरू असताना जोशी रुग्णालयात अनेक रुग्णांवर मोफत उपचार करण्यात आले. त्यामुळे रुग्णालयाचे खासगीकरण करू नये, अशी भूमिका श्रमजीवी संघटनेने घेतली आहे.

रुग्णालयाच्या खासगीकरणाला विरोध दर्शविण्यासाठी श्रमजीवी संघटनेने कार्याध्यक्षा स्नेहा दुबे-पंडित यांच्या नेतृत्वाखाली भाईंदर येथील अतिरिक्त तहसीलदार कार्यालयावर मोर्चा काढला. यावेळी संघटनेच्या कार्यकर्त्यांनी रुग्णालयासाठी भीक मांगो आंदोलन केले. त्यातून जमा झालेले पैसे अतिरिक्त तहसीलदारांकडे देण्यात आले. रुग्णालयाच्या खासगीकरणाच्या विरोधासह गरीब, मजूर, आदिवासी संबंधीच्या मूलभूत मागण्याही संघटनेच्यावतीने करण्यात आल्या. त्यात प्रामुख्याने उत्तन पाली येथे सरकारी रुग्णालय बांधावे, वन जमिनी आदिवासींच्या नावे कराव्यात, आदिवासी पाड्यांना रस्ते, वीज, पाणी या मूलभूत सुविधा द्याव्या, आदिवासींना जातीचे दाखले द्यावे, पीएमएवाय योजनेअंतर्गत गरीबांना तत्काळ घरे द्यावी, आदी विविध मागण्यांचे निवेदन संघटनेच्या शिष्टमंडळाकडून अतिरिक्त तहसिलदारांना देण्यात आले. यावेळी कमलाकर माळी, मोतीराम पवार, नागेश दुमाडा, सुलतान पटेल आदी उपस्थित होते.

> रुग्णालय खासगीकरणाचा प्रस्ताव तत्काळ रद्द करावा अशी मागणी मुख्यमंत्री व आरोग्यमंत्र्यांकडे करण्यात आली आहे. त्याचबरोबर १ मार्चला श्रमजीवी संघटनेकडून मंत्रालयावर काढण्यात येणाऱ्या आक्रोश मोर्चातही जोशी रुग्णालय खासगीकरणाचा मुद्दा प्राधान्याने घेण्यात येणार आहे. रुग्णालयाच्या खासगीकरणाला विरोध हा नागरिकांचा लढा आहे. त्यामुळे त्याबाबत जनजागृती करण्यासाठी संघटना आणखी प्रखर आंदोलन करेल.
> - स्नेहा दुबे-पंडित, कार्याध्यक्षा, श्रमजीवी संघटना

सकाळ पु.पा.३.

# वसई-विरारमध्ये पुन्हा पाणी संकट

**वसई-विरारमधील पाणी पुन्हा एकदा पेटू लागले आहे. तशी पाण्याची समस्या फार पूर्वीपासून आहे. पूर्वी विरोधक पाण्यासाठी सत्ताधाऱ्यांना घेरण्याचा प्रयत्न करत असत; परंतु गेल्या अडीच वर्षांपासून पालिकेवर प्रशासक राज असल्याने यावेळी चक्क सत्ताधारी बहुजन विकास आघाडीनेच पालिका प्रशासनाला रस्त्यावर उतरण्याचा इशारा दिल्याने खऱ्या अर्थाने पाण्याची झळ जाणवू लागल्याचे चित्र दिसू लागले आहे.**

शहर शिवार



संदीप पंडित, विरार

वसई-विरार महानगरपालिकेची लोकसंख्या दिवसेंदिवस वाढत आहे. आजमितीस येथील लोकसंख्या २५ लाखांच्या घरात गेली आहे. वाढणाऱ्या या लोकसंख्येला पाण्याचा पुरवठा करणे म्हणजे एक दिव्य होऊन बसले आहे. पूर्वी उसगाव आणि पेल्हार धरणातूनच चार नगरपालिकांना पाणी पुरवठा होत होता. तत्कालीन मुख्यमंत्री विलासराव देशमुख यांचे अल्पमतातील सरकार वाचविताना वसईचे आमदार हितेंद्र ठाकूर यांनी आपल्या एका मताच्या बदल्यात या ठिकाणी सूर्या पाणी पुरवठा योजना मंजूर करून ती कार्यान्वित करून घेतल्याने येथील पाणी प्रश्न सोडविण्यास हातभार लागला होता. परंतु मुंबईला लागून असलेल्या या शहरात लोकांचे लोंढे मात्र येतच राहिल्याने तेही पाणी अपुरे पडत आहे.

पालिकेच्या माध्यमातून पाणी प्रश्न सोडविण्यासाठी विविध योजना राबविण्यात येत आहेत. त्यापैकी सूर्या टप्पा २ चे पाणी एप्रिलपर्यंत वसई-विरार आणि मिरा-भाईंदर या शहरांना मिळणार आहे. त्याच प्रमाणे खोलसापाडा धरणाचे काम ही वेगात सुरू आहे. पालिकेच्या मालकीच्या देहर्जे धरणाच्या कामानेही गती घेतली आहे. असले तरी सद्या मात्र वसई-विरारकरांना पाणी टंचाईला सामोरे जावे लागत आहे. त्यातच प्रशासनाच्या हातात असलेल्या पालिकेच्या कारभारामुळे पाणी वाटपामध्ये अनियंत्रित आल्याने त्याचा फटका नागरिकांना बसत आहे. पूर्वी पालिकेत निवडून आलेले नगरसेवक असल्याने या ठिकाणी पाणी वाटपात तेवढी ओरड होत नव्हती. नगरसेवक कोणत्याही पक्षाचा असला तरी तो पाणी प्रश्नावर जागरूक असल्याने पाणी प्रश्न गंभीर होताना दिसत नव्हता. त्यामुळे रखडलेल्या निवडणुकांचा फटकाही पाणी प्रश्नाला बसत आहे, असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. त्यामुळेच इतकी वर्षे विरोधक ज्या प्रश्नासाठी रस्त्यावर उतरत होते, त्याच प्रश्नावर आता पालिकेच्या स्थापनेपासून आतापर्यंत सत्तेवर असलेल्या बहुजन विकास आघाडीला प्रशासनाला रस्त्यावर उतरण्याचा इशारा द्यावा लागत असल्याचे बोलले जात आहे. यामध्ये निवडणुकीचे राजकारण ही दडल्याचा आरोप विरोधक करत असले तरी पुन्हा एकदा वसई विरारच्या पाणी पेटण्याची संकेत आहेत.

लोकमत पा.नं.२.

## नालासोपाऱ्यात मुलीचे अपहरण

**नालासोपारा :** नालासोपारा येथून १४ वर्षाच्या मुलीचे अपहरण करण्यात आल्याची घटना उघडकीस आली. श्रीराम नगर परिसरात राहणाऱ्या अल्पवयीन मुलीला आरोपीने तिला सोबत पळवून नेल्याचा संशय आला त्यामुळे मुलीच्या आईने रविवारी पेल्हार पोलिस ठाण्यात मुलीच्या अपहरणाचा गुन्हा दाखल केला आहे.

## तलावात बुडून एकाचा मृत्यू

**नालासोपारा :** फणसपाडा येथील तलावात बुडून एकाचा मृत्यू झाल्याची घटना उघडकीस आली आहे. वसईच्या खैरपाडा येथील मोरा वाडीत राहणाऱ्या मिथुन शेख (वय ३०) याचा मृतदेह रविवारी दुपारी साडेबाराच्या सुमारास फणसपाडा येथील तलावात आढळून आला होता. वालीव पोलिसांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे.

Scanned with CamScanner

सकाळ पा.नं.१०

# आंदोलनाने कामकाज ठप्प

## शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचा मुंबईसह राज्यात एल्गार

मुंबई, ता. २० : विद्यापीठ व महाविद्यालयातील शिक्षकेतर कर्मचारी संघटनांनी सुरू केलेल्या बेमुदत कामकाज बहिष्कार आंदोलनामुळे आज राज्यातील अनेक विद्यापीठ आणि महाविद्यालयातील कामकाजावर मोठा परिणाम झाला. प्रशासनाकडून आमच्या मागण्यांसंदर्भात चलढकलपणा केला जात आहे. त्यामुळे आम्हाला नाईलाज म्हणून हे आंदोलन बेमुदत सुरू करावे लागले असल्याचे संघटनेकडून सांगण्यात आले.

मुंबई विद्यापीठ तसेच एसएनडीटी विद्यापीठ आणि त्या अंतर्गत येणाऱ्या अनेक महाविद्यालयांत आज कर्मचारी संघटनांनी बेमुदत कामकाज बंद आंदोलन सुरू केले. विविध महाविद्यालयांत आणि विद्यापीठ संकुलात कर्मचारी संघटनांनी ठिय्या आंदोलन करत उच्च शिक्षण विभागाच्या अधिकाऱ्यांविरोधात घोषणाबाजी केली. १५ फेब्रुवारीला उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थित झालेल्या बैठकीमध्ये पदाधिकाऱ्यांना जे आश्वासन देण्यात आले होते, त्याचे इतिवृत्त देणे अपेक्षित होते; परंतु वरिष्ठ अधिकाऱ्यांनी चुकीचे इतिवृत्त दिल्याचे संघटनेकडून सांगण्यात आले.

राज्यातील विद्यापीठ आणि महाविद्यालयांच्या कामकाजात शिक्षकेतर कर्मचारी संघटनांनी दिवसभर भाग घेतला नव्हता; मात्र सायंकाळी अधिकाऱ्यांकडून कामावर येण्यासाठी दबाव तंत्राचा वापर केल्याचे पदाधिकाऱ्यांनी सांगितले.



मुंबई : विलेपार्ले येथील साठये महाविद्यालय प्रवेशद्वाराबाहेर शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी आंदोलन केले.

### काय आहेत मागण्या?

1 महाराष्ट्र राज्य विद्यापीठीय व महाविद्यालयीन सेवक संयुक्त कृती समितीच्या माध्यमातून शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना कायम ठेवणे

2 १ जानेवारी २०१६ पासून देय असलेली सातवा वेतन आयोगातील फरकाची थकबाकी विद्यापीठ शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना मान्य करणे

3 विद्यापीठातील १४१० शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना सातवा वेतन आयोग लागू करणे, विद्यापीठ व महाविद्यालयातील रिक्त जागा भरण्यास परवानगी देणे आदी मागण्या करण्यात आल्या आहेत.

# अंगणवाडी कर्मचारीही संपावर

मुंबई, ता. २० : मानधनात वाढ करण्याचे आश्वासन राज्य सरकारने देऊनही त्याची पूर्तता न झाल्याने नाराज अंगणवाडी कर्मचाऱ्यांनी आजपासून (ता. २०) बेमुदत संप पुकारला आहे. नियमाप्रमाणे पंधरा दिवसांपूर्वी संपाची नोटीस बजावून कर्मचाऱ्यांनी संपाला सुरुवात केली. दरम्यान, संपकाळात शासनाला मदत करणार नसल्याचा इशाराही महाराष्ट्र राज्य अंगणवाडी कर्मचारी कृति समितीकडून देण्यात आला आहे. तसेच मागण्या मान्य होईपर्यंत संप करण्याचा निर्धार करण्यात आल्याचेही सांगण्यात आले.

सध्या सरकारची दडपशाही सुरू असून अंगणवाडी सेविकांनी संपात सहभागी असल्याचे हस्तलिखित पत्र प्रकल्प कार्यालयाला द्यावे, अशी विचित्र अट मांडली जात आहे; मात्र कायद्याप्रमाणे आम्ही संपाची नोटीस पंधरा दिवसांपूर्वीच दिली आहे. तसेच जो पर्यंत मागण्या पूर्ण होत नाहीत, तो पर्यंत आम्ही संप मागे घेणार नसल्याचा निर्धार असल्याचे कृती समितीचे समन्वय राजेश सिंह यांनी सांगितले.

दरम्यान, येत्या २८ फेब्रुवारीपासून मुंबईतील आझाद मैदानात बेमुदत आंदोलनाला सुरुवात होईल. नोटीस बजावून देखील सरकारने दुर्लक्ष करत कृती समितीला बोलण्यास पाचारण केले नसल्याने संपाचा निर्णय घेण्यात आला असल्याचे कृती समितीने सांगितले.

### यंत्रणा कोलमडणार?

अंगणवाडी कर्मचारी संपावर गेल्यावर राज्यात कुपोषण वाढण्याची शक्यता वर्तवली जात आहे. तसेच ३ ते ६ वयोगटातील मुलांना शिक्षण आणि आहार मिळणार नाही. शिवाय एकात्मिक बाल विकास सेवा योजना प्रकल्प कार्यालयाला मुलांची माहिती मिळणे कठीण होईल, अशी शक्यता या निवेदनात वर्तवली आहे.

Scanned with CamScanner

लोकसत्ता पु-पा-9

# विरार-नालासोपारा रस्ता धोकादायक

## रस्त्याच्या मधोमध सांडपाणी प्रकल्पाची झाकणे

लोकसत्ता विशेष प्रतिनिधी



**वसई** : विरार-नालासोपाऱ्याला जोडणाऱ्या नवीन रस्त्यावर सांडपाणी प्रकल्पाच्या वाहिन्या असल्याने वाहतुकीला धोकादायक ठरणार आहे. त्याची १२ झाकणे ही रस्त्याच्या मधोमध असल्याने वाहनचालकांना अडथळा होत आहे.

वसई विरार महापालिकेने नालासोपारा ते विरार हा नवीन रस्ता तयार केला आहे. नालासोपारा येथील श्रीप्रस्थ पासून निघणारा हा रस्ता थेट विरारच्या म्हाडा वसाहतीत निघतो. यामुळे विरार-नालासोपारा हे अंतर अवघ्या १० मिनिटांत जोडले गेले आहे. हा रस्ता १.६ किलोमीटर लांबीचा आणि १५ मीटर रुंद असून त्यासाठी ८ कोटी रुपयांचा खर्च आला आहे. मात्र, या रस्त्याच्या खालून सांडपाणी प्रकल्पाच्या वाहिन्या गेल्या आहेत. त्याची झाकणे रस्त्याच्या वरील भागात आहेत. सुमारे १२ ठिकाणी अशा प्रकारची झाकणे आहेत. त्याचा वाहनचालकांना अडथळा होत आहे. त्यामुळे भरधाव वेगाने येणाऱ्या वाहनांचा अपघात घडू शकतो, अशी भीती स्थानिकांनी व्यक्त केली आहे.

पालिकेने हा रस्ता तयार करण्यापूर्वी व्यवस्थित नियोजन केले नाही. सांडपाणी प्रकल्पाची झाकणे रस्त्याच्या वर येत असताना पालिकेने त्याची खबरदारी घेतलेली नाही. या सांडपाणी प्रकल्पाची वाहिन्या म्हाडाच्या आहे. त्यावर पाहणी करून तोडगा काढला जाईल असे आश्वासन पालिकेने दिले.

# उघड्या गटारांवरील स्लॅबही अपघातांस कारणीभूत

लोकसत्ता विशेष प्रतिनिधी



**वसई** : वसई विरार शहरातील उघड्या गटारांच्या समस्येपाठोपाठ आता गटारांवरील टाकण्यात आलेल्या स्लॅबची समस्या निर्माण झाली आहे. पालिकेने ठिकठिकाणी टाकलेल्या स्लॅबचे काम निकृष्ट असल्याने दुर्घटनेची भीती व्यक्त होत आहे.

मागील वर्षी पालिकेच्या उघड्या गटारात पडून दोन दुर्घटना घडल्या होत्या. ६ नोव्हेंबर २०२२ रोजी विरार पश्चिमेच्या एमबी इस्टेट मध्ये राहणाऱ्या कमलाबेन शहा (६८) या महिलेला उघड्या गटारात पडून मृत्यू झाला होता. २१ नोव्हेंबर २०२२ रोजी नालासोपारा पूर्व येथील अग्रवाल नगर परिसरातील एका गटारात ऋषभ सरकार (२५) याचा उघड्या गटारात पडून मृत्यू झाला होता. शहरातील गटारांवर झाकणे नसल्याने त्यात पडून या दुर्घटना घडत होत्या. या दुर्घटनेनंतरही अनेक ठिकाणच्या गटारांवर झाकणे नसल्याचे उघडकीस आले होते. गटारांवर झाकणे नसताना दुसरीकडे गटारांवर टाकण्यात आलेले स्लॅब निकृष्ट असल्याने नागरिकांना धोका निर्माण झाला आहे.

मागील आठवड्यात वसई पूर्वेच्या वालीव येथील धुमाळ नगर परिसरातील औद्योगिक क्षेत्रात एका गटारारील स्लॅब कोसळला. यावेळी गटारावर असलेला एक टेम्पो गटारात पडला आणि या दुर्घटनेत टेम्पो चालकाचा मृत्यू झाला. या मुळे गटारांवरील स्लॅबची समस्या निर्माण झाली आहे. पालिका ठेकेदाराकडून ही कामे करवून घेते. मात्र ठेकेदार जास्त नफ्यासाठी निकृष्ट काम करत असल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे. वालीव येथे स्लॅब कोसळून झालेल्या दुर्घटनेची चौकशी करावी अशी मागणी काँग्रेसच्या पर्यावरण विभागाचे सरचिटणीस समीर वर्तक यांनी केली आहे.

वसईच्या पूर्वेकडे अनेक ठिकाणी गटारांवर टाकण्यात आलेले स्लॅब हे निकृष्ट असून कधीही दुर्घटना घडू शकते अशी माहिती स्थानिक शिवसेना नेते काकासाहेब मोटे यांनी दिली आहे. आम्ही पालिकेकडे वारंवार तक्रारी केल्या आहेत. मात्र, काहीच उपाययोजना होत नसल्याचे त्यांनी सांगितले.

Scanned with CamScanner

लोकसत्ता पु. पा. ३०

## नालासोपाऱ्यात सात लाखांची चोरी

**वसई :** नालासोपारा पूर्वेच्या प्रगतीनगर परिसरात एका मित्रानेच मित्राच्या घरी सुमारे सात लाख रुपयांची चोरी केली आहे. चोरी करून आरोपी नेपाळ येथे पळून जाण्याच्या तयारीत असताना तुळींज पोलिसांनी सुरत येथील विमानतळावरून त्याला अटक केली आहे.

नालासोपारा पूर्वेतील ठाकूर विद्यालयजवळील शिवसाई अपार्टमेंटमध्ये सरोजा मुन्नालाल यादव यांच्या घरातील रोख रक्कम व दागिने, असा सात लाखांचा मुद्देमाल चोरट्याने लंपास केला होता. याप्रकरणी तुळींज पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला होता. मिळालेल्या माहितीच्या आधारे तुळींज पोलिसांनी पथके तयार करून तपास सुरू केला होता. आरोपी हा नेपाळ येथे पळून जाण्याच्या तयारीत असल्याची माहिती मिळताच पोलिसांनी सापळा रचून आरोपीला सुरत येथील विमानतळावरून अटक करण्यात आली आहे.

नवीन बिस्ट (२७) असे या अटक केलेल्या आरोपीचे नाव असून, त्याच्याकडून पाच लाख ६५ हजार रुपये इतका मुद्देमाल हस्तगत केला आहे.

दरम्यान, तुळींज पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक शैलेंद्र नगरकर, सहायक पोलीस निरीक्षक (गुन्हे) मिथुन म्हात्रे, पोलीस उपनिरीक्षक बाळासाहेब बांदल व त्यांच्या पथकाने ही कारवाई केली आहे.

## वसईमध्ये मृत्युंजय महामोर्चा

**लोकसत्ता वार्ताहर**

**वसई :** मागील अनेक वर्षांपासून समस्या सुटलेल्या नसल्याने वसईकर आक्रमक झाले आहेत. प्रशासनाचे पुन्हा लक्ष वेधण्यासाठी रविवारी तहसीलदार कार्यालयावर मृत्युंजय महामोर्चा काढण्यात आला होता.

वसई-विरारमधील जनतेला मागील अनेक वर्षांपासून विविध समस्या भेडसावत आहेत. त्यात महापालिकेतून गावे वगळणे, नियमावलीचा आधार न घेताच आकारण्यात आलेली बेकायदा वाढीव घरपट्टी, अनियमित पाणीपुरवठा, हरित पट्ट्यातील एफएसआय वाढीचा निर्णय रद्द करणे, आरोग्य सेवा, स्थानिकांचे प्रलंबित प्रश्न या विविध प्रश्नांबाबत वारंवार पाठपुरावा करूनही प्रश्न मार्गी लागत नसल्याने ग्रामस्वराज्य अभियान व शहरातील विविध सामाजिक संघटना एकत्रित येत मृत्युंजय महामोर्चा काढला होता.

नरवीर चिमाजी अप्पा मैदान ते तहसीलदार कार्यालय, असा हा मोर्चा काढण्यात आला होता. यात मोठ्या संख्येने नागरिक सहभागी झाले होते.

वसईतील जनतेचे प्रश्न सरकारने सोडवावेत, अशी मागणी करण्यात आली. या सर्व प्रश्नांकडे सरकारचे लक्ष वेधले जावे, यासाठी राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनाही निवेदनाचे पत्र वसईच्या तहसीलदार उज्वला भगत यांच्याकडे देण्यात आले आहे. आमच्या मागण्या मान्य न झाल्यास आणखी तीव्र आंदोलन केले जाईल, असा इशारा आंदोलनकर्त्यांनी शासनाला दिला आहे.

## दुचाकी चोरणारी टोळी जेरबंद

**लोकसत्ता वार्ताहर**

**वसई :** दुचाकी चोरणाऱ्या आंतरराज्य टोळीला गुन्हे शाखा कक्ष २ च्या पोलिसांनी अटक केली आहे. या आरोपींकडून १३ मोटरसायकल हस्तगत केल्या आहेत.

वसई-विरारमध्ये मोटरसायकल चोरीच्या घटना वाढल्या होत्या. याप्रकरणी गुन्हे शाखा २ च्या पथकाने तांत्रिक विश्लेषणाद्वारे तपास करून चार जणांच्या टोळीला अटक केली आहे. त्यात आनंद ओझा (२५), धीरज ओझा (२१), कौशिक देविदास (२०) आणि १६ वर्षांच्या एका अल्पवयीन आरोपीचा समावेश आहे. त्यांच्याविरोधात १३ पोलीस ठाण्यात दुचाकी चोरीचे गुन्हे दाखल होते. त्या सर्व १३ गुन्ह्यांची उकल करण्यास पोलिसांना यश आले आहे. या टोळीकडून सात लाख ५५ हजार रुपये किमतीच्या मोटरसायकली हस्तगत करण्यात आल्या आहेत. ही कामगिरी पोलीस उपायुक्त अविनाश अंबुरे, साहाय्यक पोलीस आयुक्त अमोल मांडवे यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखा वसई युनिट २ ने केली आहे.

Scanned with CamScanner

CMYK

MHT

# मुंबई हिंदमाता टाइम्स

राष्ट्रीय हिन्दी दैनिक

मुंबई, मंगलवार 21 फरवरी 2023

संपादक: दिनेश आर सिंह | RNI No. MAHHIN/2006/20347 | E-mail: mumbaihindmatatimesnews@gmail.com | Website : www.mumbaihindmatatimes.com | वर्ष - [illegible], अंक-43 | पृष्ठ-8 | मूल्य रु5/- | [illegible]

हेलमेट लगाना सेहत और जेब दोनों के लिए फायदेमंद ...पेज-3

11 साल बाद फिल्मों में लौट रही यह टॉप एक्ट्रेस ...पेज-6

| आज का पंचाग | सूर्योदय / सूर्यास्त | आज का मौसम | तापमान | शेयर बाजार | सर्राफा बाजार |
|---|---|---|---|---|---|
| संवत् 2079, फाल्गुन शुक्ल पक्ष प्रतिपदा | 07.04 am / 06.41 pm | [illegible] | अधिकतम 33°C / न्यूनतम 23°C | NSE Open: 17,965.5 \| Close: 17,844.60; BSE Open: 61,112.84 \| Close: 61,002.57 | Rs. 56,830 Per 10 gm; Rs. 68,500 Per Kg. |

# हेलमेट लगाना सेहत और जेब दोनों के लिए फायदेमंद

## हेलमेट 400 रुपए जबकि पहला दंड ही 500 रुपए



### चलाया जाएगा जांच अभियान

सुप्रीम कोर्ट के आदेश के मुताबिक बाइक सवारों को हेलमेट पहनना अनिवार्य है। इस तथ्य के बावजूद कि हेलमेट ने कई चालकों की जान बचाई है, हेलमेट के उपयोग को हतोत्साहित किया जाता है। यातायात विभाग के अधिकारी ने बताया कि वरिष्ठ पुलिस अधिकारियों के निर्देशानुसार अब से शहर के विभिन्न स्थानों पर प्रतिदिन बिना हेलमेट चेकिंग अभियान चलाया जायेगा।

**राकेश सिंह**

**नालासोपारा।** बाइक चालकों की सुरक्षा को ध्यान में रखते हुए सरकार और सुप्रीम कोर्ट ने हेलमेट पहनना अनिवार्य किया है। बावजूद इसके कई लोग हेलमेट का उपयोग करने से परहेज करते हैं। एक हेलमेट मात्र 400 रुपए में मिल जाता है, जबकि बीना हेलमेट के पकड़े जाने पर पहला ही दंड 500 रुपए है, यानि बीना हेलमेट के बाइक चलाना सेहत के लिए और पकड़े जाने पर जेब के लिए भी हानिकारक है। वसई-विरार में बिना हेलमेट के सैकड़ों बाइक चालकों ने लाखों रुपये का जुमार्ना भरा है।

**दो लाख प्रतिवर्ष**

वसई व विरार ट्रैफिक पुलिस ने जनवरी से दिसंबर 2022 के बीच 572 वाहन चालकों से दो लाख 85 हजार 500 जुमार्ना वसूल किया है। नए नियम के मुताबिक बिना हेलमेट पकड़े जाने पर पहली बार 500 रुपये और दूसरी बार 1500 रुपये जुमार्ना देना होगा। हालांकि वसई तालुका में हेलमेट न लगाने वालों की संख्या ज्यादा है।

**क्या पुलिस करती है हेलमेट का इस्तेमाल?**

बाइक चलाते समय हेलमेट लगाना हर किसी के लिए अनिवार्य है। पुलिसकर्मी आम लोगों पर तो कार्रवाई कर लेते हैं, लेकिन खुद कई पुलिसकर्मी ही हेलमेट का प्रयोग नहीं करते और वसई-विरार में यह इन लोगों के लिए आम बात है।

**ज्यादा का जुर्माना**

यदि एक हजार रुपए के हेलमेट का प्रयोग किया जाए तो आने वाले संकट से बचा जा सकता है। हेलमेट के प्रयोग को लेकर नागरिकों में काफी जागरूकता आई है, लेकिन अभी भी कई लोग हेलमेट का प्रयोग नहीं करते हैं। इसलिए सभी को हेलमेट का प्रयोग करना चाहिए। एक हेलमेट 400 रुपए मिल जाता है, जबकि बीना हेलमेट पकड़े जाने पर पहला दंड ही 500 रुपए है।

Scanned with CamScanner